ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January-June 2022- Vol. 11 No. 1

# ना. बाळासाहेब थोरात यांचे ई - पीक पाहणी प्रकल्पातील योगदान

**प्राचार्य, डॉ. राजधर टेमकर****

**नवनाथ विठोबा नागरे***

*पदव्युत्तर राज्यशास्त्र, विभाग संशोधन केंद्र,*
*हिंदसेवा मंडळ, पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर.*

**गोषवारा :**

*महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री ना. बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली महसूल विभाग अधिक लोकाभिमुख आणि पारदर्शी सेवा देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे मागील दोन वर्षापासून महाराष्ट्राने अनुभवले आहे. यामध्ये कोरोना काळात मुद्रांक शुल्क कपातीचा घेतलेला निर्णय यामुळे बांधकाम क्षेत्रात आलेली तेजी आणि त्याचा परिपाक म्हणून अर्थव्यवस्थेच्या विकासाला मिळालेली गती हा एक महत्वपूर्ण निर्णय आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सात-बारा उताऱ्यावर पीक पाहणीची अचूक नोंद होण्यासाठी महसूल विभागाने हाती घेतलेली महत्त्वपूर्ण मोहीम म्हणजे "माझी शेती माझा सातबारा, मीच नोंदवणार माझा पिक पेरा" हा नाविन्यपूर्ण बदल म्हणजे आधुनिक बदलाची नांदीच म्हणावी लागेल कारण यामुळे महसूल विभागाचे कामकाज अधिक पारदर्शक होणार आहे तसेच त्याचा सरकार बरोबरच शेतकऱ्यांना देखील लाभ होणार आहे. महाराष्ट्रातील शेतकरी सक्षम करण्यासाठी या प्रकल्पाचा उपयोग होणार आहे. महसूल व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी १५ ऑगस्ट २०२१ पासून ई पीक पाहणी प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. ई-पीक पाहणी मोबाईल ॲप प्रकल्पास राज्यभरातून चांगला प्रतिसाद मिळाला असून याद्वारे लाखो शेतकऱ्यांनी आपल्या पिक पेरा ची नोंद केलेली दिसून येते. त्यामुळेच ई-पीक पाहणी योजना तसेच या योजनेचे फायदे-तोटे काय आहेत हे जाणून घेण्यासाठी सदर संशोधन लेख महत्वपूर्ण आहे.*

प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्यात महसुल व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणारा हा महत्वपूर्ण प्रकल्प राज्यातील प्रत्येक कुटुंबाशी जोडला गेला आहे. या प्रकल्पामुळे शेतकरी बांधवांना आपल्या पिकाची पिक पाहणीची माहिती स्वतः नोंदविणे शक्य होणार असून आधुनिक डिजिटल युगात शेतकऱ्यांना सहज पारदर्शी व बिनचूक पद्धतीने आपल्या पिकाची नोंदणी करता येणार आहे. यासाठी ना. बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली दूरदर्शी विचार करत असलेल्या राज्याच्या महसूल विभागाने केलेला हा बदल संपूर्ण देशासाठी निर्णायक ठरत आहे. ई-पीक पाहणी या शेती क्षेत्रातील आमुलाग्र बदलामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतात उभे राहून आपल्या पिकाची नोंद करता येणार आहे. याबद्दल शेतकऱ्यांना पुरेशी माहिती नसली तरी कुणाच्या तरी मदतीने ई-पीक पाहणी मध्ये नोंद करणे शक्य आहे. सदर योजना सुरु होई पर्यंत शेतकऱ्यांच्या पिक पेऱ्याची नोंद संबंधित गावातील तलाठी यांच्यामार्फत केली जात होती. प्रत्यक्ष गटात न जाता शेतकरी ज्या पिकाची नावे सांगेल त्याच पिकाचा पेरा झाला असे ग्राह्य धरुन त्याची नोंद होत असे. त्यामुळे नुकसान भरपाईच्या दरम्यान शेतकरी, सरकार व अधिकारी यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. अनेक वेळा शेतकऱ्यांच्या पिकाच्या नोंदी नसताना ही शासकीय मदत लाटली जात होती. शेतकऱ्याने पेरलेल्या पिकाची अचूक नोंद शासन दप्तरी व्हावी आणि शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा व्हावा या दृष्टीने ई-पीक पाहणी ॲप तयार करण्यात आले आहे. या माध्यमातून शेतकऱ्याने कोणत्या गटामध्ये कोणते पिक घेतले आहे याची अचूक नोंद होण्यास मदत होणार आहे.

**पिकाची ई - पिक पाहणी ॲप मध्ये नोंदणी करण्याची पद्धती :**

प्रत्येक शेतकऱ्यांने आपल्या मोबाईलच्या प्ले स्टोअर मधून ई-पिक पाहणी हे ॲप डाऊनलोड करुन घेतल्यानंतर ॲप ओपन करुन नविन खातेदार म्हणून नोंदणी करुन घ्यावी लागते. यामध्ये आपला जिल्हा, तालुका आणि गावाची निवड करावयाची आहे. त्यानंतर खातेदाराचे पहिले नाव, मधले नाव, आडनांव आणि गट क्रमांक टाकायचा आहे. गट क्रमांक टाकल्यानंतर शेतकऱ्याचे नाव समोर येते. त्यानंतर खाते क्रमांक तपासून आपला मोबाईल नंबर टाकायचा आहे. जो पुन्हा बदलता येत नाही. त्यानंतर मोबाईलवर चार अंकी पासवर्ड येईल तो कायमस्वरूपी लक्षात ठेवावा लागणार आहे. कारण या ॲपमध्ये तोच पासवर्ड लागणार आहे. तो एसएमएस द्वारे पाठवला जातो. या सर्व प्रक्रीयेनंतर आपली नोंदणी यशस्वी होते. यानंतर

अॅप हे पूर्णपणे बंद करुन चालू करायचे आहे. अॅप पुन्हा चालू केल्यानंतर पुन्हा खातेदाराला स्वतःचे नाव निवडावे लागते. यानंतर मॅसेजद्वारे आलेला पासवर्ड येथे नमूद करायचा आहे. त्यानंतर पुढे परीचयामध्ये खातेदाराचा फोटो अपलोड करायचा त्यानंतर दिलेली सर्व माहिती भरून सबमिट करायचे आहे. त्यानंतर होममध्ये येऊन पिकाची माहिती नोंदवा असा एक फॉर्म येतो. यामध्ये खाते क्रमांक, गट क्रमांक, जमिनीचे क्षेत्र हेक्टरमध्ये नोंदवायचे आहे. पुढे हंगाम निवडावयाचा आहे म्हणजेच खरीप की रब्बी किंवा संपूर्ण वर्ष निवडायचे आहे. त्यानंतर पिक पेरणीचे क्षेत्र किती आहे. याचा उल्लेख करायचा आहे. त्यानंतर पिकाचा वर्ग यामध्ये जे आपलं पिक आहे तेच निवडायचे आहे कारण यामध्ये वेगवेगळे प्रकार असतात. त्यानंतर दिलेल्या पर्यायपैकी आपण घेतलेल पिक निवडायचे आहे. पुन्हा त्या पिकाचे क्षेत्र नोंदवायचे आहे. त्यानंतर त्या पिकासाठी सिंचनाचे साधन काय आहे याचा उल्लेख करावा लागतो. पिक लागवडीची तारीख नोंद करायची आहे. त्यानंतर कॅमेराचा पर्याय येईल यातून फोटो काढायचा आणि तो फॉर्म सबमिट करायचा आहे. सबमिट झाल्यानंतर पुन्हा होमवर आल्यावर ही नोंदवलेली माहिती केवळ आपल्या मोबाईल मध्ये सेव्ह होते ती सेव्ह झाली किंवा नाही हे बघावयाचे असेल तर पुन्हा पिकाची माहिती नोंदवा यावर क्लिक करायचे आहे. यामध्येही पिकाची माहिती यावर क्लिक करवयाचे आहे. यामध्ये आपण भरलेली माहिती दिसते जी माहिती मोबाईल मध्ये सेव्ह झालेली असेल. ही माहिती संबंधित सर्वरला पाठवण्यासाठी अपलोड या बटनाला क्लिक करायचे आहे. त्यानंतर आलेल्या दोन पर्यापैकी परिचय माहिती क्लिक करुन माहिती अपलोड झालेली पहायला मिळते त्याचप्रमाणे पिक माहिती वर क्लिक करुन अपलोड करायचे आहे. अशा प्रकारे ई-पिक पाहणी या अॅपद्वारे आपल्याला आपल्या पिकाच्या माहितीची नोंद करता येते.

**ई - पीक पाहणीचे फायदे :**

१. ई-पीक पाहणी या अॅप मुळे शेतकऱ्यांच्या पीक पेरणीची अचूक नोंद होणार आहे.
२. या अॅपरील नोंदीमुळे राज्यात, देशात एखाद्या पिकाचा पेरा किती झाला आहे याची अचूक आकडेवारी एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.
३. पिकाच्या अचूक आकडेवारीमुळे उत्पादनाबद्दल अंदाज बांधता येतो. यावरुन भविष्यात लागणारी बी-बियाणे तसेच खते उपलब्ध करुन देण्यास मदत होणार आहे.
४. शेती क्षेत्रातील गटानिहाय झालेल्या पीक नोंदीचा फायदा हा देशामध्ये किती क्षेत्रावर किती ऊत्पन्न झाले हे समजण्यासाठी उपयोगी ठरणार आहे.
५. पिकाच्या छायाचित्रामुळे किती अक्षांशः आणि किती रेखाअंशावर कोणत्या पिकाचा किती पेरा झाला आहे हे समजणार आहे.
६. एका मोबाईलवरून २० शेतकऱ्यांच्या आपल्या पिकाच्या नोंदी करता येणार आहेत. प्रत्येक शेतकऱ्याकडे मोबाईल नसतो त्यामुळेच अशा प्रकारची सोय करण्यात आली आहे.
७. या प्रकल्पाचा उपयोग कृषी पणन या विभागाला देखील होत आहे. याबरोबरच कृषी उत्पादनांची आयात-निर्यातीच्या नियोजनातही देशासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरत आहे.

**ई - पीक पाहणी अॅपमधील त्रुटी :**

१. ई-पीक पाहणीबाबत शेतकऱ्यांना आतापर्यंत योग्य जनजागृती आणि मार्गदर्शन झालेले नाही.
२. अत्याधुनिक प्रकारचे मोबाईल वापराची माहिती नसणाऱ्या शेतकऱ्यांना अॅपमध्ये नेमकी कोणती माहिती भरायची आहे हे माहिती नसल्याने या प्रक्रियेकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता दिसून येते.
३. दरवर्षी आपल्या पिकांची माहिती अशाच प्रकारे शेतकऱ्यांना माहिती द्यावी लागणार हे या ठिकाणी स्पष्ट केलेले नाही.

**ई - पीक पाहणी योजनेची फलश्रुती :**

महाराष्ट्र राज्याच्या महसूल व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी १५ ऑगस्ट २०२१ पासून सुरु करण्यात आलेल्या या योजनेत नोव्हेंबर २०२१ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील एकूण ९० लाख ३९ हजार ८४८ शेतकऱ्यांनी पिक पाहणी अॅपवर नोंदणी केली असून त्यापैकी ६४ लाख ४८ हजार ३६८ शेतकऱ्यांची पिक पाहणी अॅपवरील संपूर्ण नोंदणी पूर्ण झाली आहे. यामध्ये औरंगाबाद विभागातील २० लाख ७५ हजार १०८ शेतकऱ्यांपैकी १७ लाख २७ हजार ९१६ शेतकऱ्यांनी या अॅपवर नोंदणी केली आहे. अमरावती विभागातील १४ लाख १५ हजार २५२ शेतकऱ्यांपैकी ११ लाख ९७ हजार २७५ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. नागपूर विभागात ११ लाख ५० हजार २०३ शेतकऱ्यांपैकी ०९ लाख ९३ हजार ७०९ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. नाशिक विभागातील १९

लाख ३४ हजार ७६७ शेतकऱ्यांपैकी १३ लाख ८९ हजार ७५६ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. पुणे विभागात २० लाख ३३ हजार ४४१ शेतकऱ्यांपैकी ०९ लाख ९४ हजार ७४७ शेतकऱ्यांनी तर कोकण विभागातील ०३ लाख ३१ हजार ७७ शेतकऱ्यांपैकी ०१ लाख ४४ हजार ९६५ शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी नोंदणी पूर्ण केली आहे. अशा या महत्वपूर्ण योजनेला अल्पवधीत मिळालेल्या यशामुळे देश पातळीवर देखील या प्रकल्पाला नावलौकिक मिळाला आहे. भारतातील काही राज्यांनी देखील या योजनेचा अभ्यास करून आपल्या राज्यांमध्ये राबविण्यास सुरवात केली आहे.

**समारोप :**

महाराष्ट्रातील नागरिकांना सहज, पारदर्शक व बिनचूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्याच्या महसूल विभागाने सातत्यपूर्ण प्रयत्न केला असून या माध्यमातून संगणकीकृत सातबारा, ई-पीक पाहणी प्रकल्प राज्यासाठी मार्गदर्शक ठरत आहे. ई-पीक पाहणी प्रकल्प हा एक क्रांतिकारी निर्णय असून या प्रकल्पामुळे पिकाची लागवड, उत्पादन याबाबतची अचूक माहिती शेतकऱ्यांना मिळणार आहे. भविष्यात हा प्रकल्प संपूर्ण देशभरात राबवला जाईल याबाबत विश्वास वाटतो कारण महाराष्ट्र राज्यात महसूल मंत्री ना. बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केलेल्या ई - पीक पाहणी या योजनेचे यश पाहून हा पथदर्शी प्रकल्प राजस्थान सरकारनेही स्वीकारला असून त्याच्या अभ्यासासाठी राजस्थान सरकारच्या उच्च स्तरीय अधिकारी पथकाने महाराष्ट्रात येऊन या प्रकल्पाचे बारकावे समजून घेतले व त्यांच्या सरकारच्या ई-गिरदावरी या प्रकल्पात सुधारणा करून आता पिकांची नोंद थेट शेतकऱ्यांकडून केली जाणार आहे. अशा या महत्वपूर्ण योजनेने अल्पावधीत मिळविलेले यश नक्कीच महत्वाचे असून या योजनेत नवीन सुधारणांसह अधिक कार्यक्षमतेने राबविण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्याबरोबरच त्यांना प्रशिक्षण दिल्यास योजनेला यापेक्षाही अधिक यश मिळेल.

कुट शब्द / मूलभूत शब्द : ई - पीक पाहणी, महसूल, कृषी

**संदर्भ :**

१. *संवाद ७ दशकाचा, योगेश आसोपा, यश प्रकाशन, २०२१.*
२. *ई-पीक पाहणी, महसूल विभाग, महाराष्ट्र शासन*
३. *दैनिक लोकमत,ई-पीक पाहणी प्रकल्प देशासाठी आदर्शवत, सप्टेंबर १२, २०२१.*
४. *दैनिक अग्रोवन, ई-पीक पाहणी योजना देशपातळीवर राबविली जाईल, जानेवारी १३, २०२२.*
५. *महाराष्ट्राचा डिजिटल सातबारा, अमृतवेल मिडीया प्रा.लि., मुंबई.*
६. ***www.landrecord.mahaonline.gov.in***